**जा.क्र./OW.No.359/पोउआ/प्रकटीकरण** /2018
**पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.**
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.
**दूरध्वनी क्र.** /Tel. No. 2262 1220
**दिनांक**/Date : 27/02/2018

प्रति,

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
वेब डेव्हलपमेंट सेंटर,
पोलीस आयुक्तांचे कार्यालय,
मुंबई.

विषय :– 'Best Conviction of the Month January - 2018' उत्कृष्ट गुन्हे शोध संकेतस्थळावर ठेवणेबाबत....

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई याचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयातील अधिकारी, अंमलदाराना बेस्ट कन्व्हेक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे दोषसिध्दी पुरस्कार पारीत करण्यात येतो. माहे जानेवारी – २०१८ करीताचे बेस्ट कन्व्हेक्शन ऑफ दि मंथ, बांद्रा पोलीस ठाणे गुरक्र.३०९/२०१३ कलम ४५२,३९२, ३९७,३०२ भादंवि. या गुन्हयास देण्यात आलेले आहे.

सदर उत्कृष्ट गुन्हे दोषसिध्दीची (बेस्ट कन्व्हेक्शन ऑफ दि मंथ) माहिती सोबत जोडण्यात आली असून संकेतस्थळावर ठेवण्यात यावी.

सही/–
( **दिलीप सावंत** )
पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि.,मुंबई.

## बेस्ट कन्व्हीक्शन ऑफ दि मंथ माहे जानेवारी –२०१८

**बांद्रा पोलीस ठाणे, मुंबई.**

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | बांद्रा पोलीस ठाणे गुरक्र.३०९/२०१३ कलम ४५२,३९२,३९७,३०२ भादंवि. |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक ११/०६/२०१३ रोजी १३.५२ ते २०.०० वा.चे सुमारास |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | फ्लॅट नं. १००१, मधुबन को.ऑ.हौसिंग सोसायटी, १० वा माळा, सेंट ॲण्ड्युस रोड, बांद्रा पश्चिम, मुंबई ५०. |
| ४ | **फिर्यादी** | श्री. सुनिल रमेश चैनानी वय ५८ वर्षे |
| ५ | **बळीत/मयत** | श्रीमती आरती उर्फ नलिनी सुनिल चैनानी |
| ६ | **आरोपी अटक** | १) सैफरजा शब्बीर भावनगरी वय ३२ वर्षे,<br>२) परवेज वाहिद खान वय ३७ वर्षे<br>**अटक दिनांक १२/०६/२०१३ रोजी** |

बांद्रा पोलीस ठाणे गुरक्र.३०९/२०१३ कलम ४५२,३९२,३९७,३०२ भादंवि. या गुन्हयात दिनांक ११/०६/२०१३ रोजी १३.५२ ते २०.०० वा.चे सुमारास फ्लॅट नं. १००१, मधुबन को.ऑ.हौसिंग सोसायटी, १० वा माळा, सेंट ॲण्ड्युस रोड, बांद्रा पश्चिम, मुंबई ५०.याठिकाणी गुन्हयातील अज्ञात आरोपीताने फिर्यादीच्या घरामध्ये घुसुन त्यांची पत्नी सौ. आरती हिच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करून सोन्याचे, डायमंडचे, मोत्याचे दागिने व रोख रू. ५०१०/–अशी एकुण किंमत रू.५,८५,०१०/–ची मालमत्ता जबरदस्तीने काढून घेवून तीला जीवे ठार मारून तिचा खुन केला म्हणुन दिनांक ११/०६/२०१३ रोजी सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

बांद्रा पोलीस ठाणेच्या पथकाने नमूद गुन्हयाच्या तपासामध्ये गुन्हयाच्या घटनास्थळी मिळून आलेल्या मोबाईल फोन चे क्रमांकाचा एसडीआर प्राप्त केला. त्यावरून सदर पथकाने आरोपी परवेज वाहिद खान वय ३७ वर्षे यास ताब्यात घेतले. सदरवेळी तपासादरम्यान पथकाचे लक्षात आले की, ताब्यातील आरोपीत इसम हा मुकबधीर असुन त्यास लिहीता वाचता येत नाही. सदर पथकातील तपासी अधिकारी यांनी खानाखूणा करून कौशल्याने चौकशी केली असता आरोपीने त्याचा मुकबधीर साथीदारासह सदरचा गुन्हा केल्याची कबूली दिली. सदर पथकाने आरोपी परवेज वाहिद खान वय ३७ वर्षे यांचे मदतीने व पाहिजे आरोपीचे मोबाईल टॉवर लोकेशनद्वारे त्याचा शोध घेवून आरोपी सैफरजा शब्बीर भावनगरी वय ३२ वर्षे यास ताब्यात घेवून नमुद दोन्ही आरोपींनी गुन्हयात वापरलेला वस्तारा, गुन्हयातील दुसऱ्या आरोपीचा मोबाईल, दोन्ही आरोपीतांकडून गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता ही दुभाषीक श्री. एस्. विनयकुमार यांच्या मदतीने निवेदन पंचनाम्यान्वये हस्तगत करण्यात आली. सदर पथकाने आरोपीतांचा गुन्हयातील सहभाग असल्याचे निष्पन्न झालेवरून आरोपी क्र. १) सैफरजा शब्बीर भावनगरी वय ३२ वषे, व २) परवेज वाहिद खान वय ३७ वर्षे यांना नमुद गुन्हयात दिनांक १२/०६/२०१३ रोजी रितसर अटक केली. सदर गुन्हयाचा सखोल तपास करून दोन्ही आरोपीतांविरूध्द सबळ पुरावा मिळवुन दिनांक १०/०९/२०१३ रोजी मा. महानगर दंडाधिकारी, १२ वे न्यायालय, बांद्रा, मुंबई येथे कोर्ट केस क्र. २२१८/पीडब्ल्यू/२०१३ अन्वये दोषाराप पत्र पत्र सादर केले तसेच सदर आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळवुन दिनांक ०९/०५/२०१३ रोजी मा. सत्र न्यायालय,मुंबई येथे सेशन केस क्र. ९१५/२०१३ अन्वये सदरचा गुन्हा वर्ग करण्यात आला.

**सदर पथकाने खटल्यामध्ये सुनावणीदरम्यान न्यायालयात दुभाषीक उपलब्ध करून देवून व खटल्याचे गांभीर्य ओळखून विशेष सरकारी अभियोक्ता यांचेकडून रिटर्न ऑरग्युमेंट बनविले.** तसेच मा. सत्र न्यायालयात सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन साक्षीदार यांना सुनावणीचे वेळी हजर ठेवले. तसेच सबळ परीस्थीतीजन्य पुरावा व वैद्यकीय तपासणीबाबतचा वैदयकीय पुरावा आणि २८ पुरक साक्षीदार/पंच सादर केल्याने दिनांक २२/०१/२०१८ रोजी मा. सत्र न्यायालय, मुंबई यांनी आ.क्र.१) सैफरजा शब्बीर भावनगरी वय ३२ वषे, व २) परवेज वाहिद खान वय ३७ वर्षे यांना प्रत्येकी भादवि कलम ३०२ प्रमाणे **आजन्म कारावास** व रु.२५,०००/–

द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०१ वर्षे सश्रम कारावास तसेच भादवि कलम ३९४ प्रमाणे ०७ वर्षे सश्रम कारावास व रु.२५,०००/–द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०१ वर्षे सश्रम कारावास तसेच भादवि कलम ४५२ प्रमाणे ०५ वर्षे सश्रम कारावास व रु.२५,०००/– द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०१ वर्षे सश्रम कारावास अशी शिक्षा दिली.

बांद्रा पोलीस ठाणेच्या पथकाने फिर्यादींचे घरात जबरीने घुसुन घरातील महिलेवर धारदार शस्त्राने हल्ला करून सोन्याचे, डायमंडचे, मोत्याचे दागिने व रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेवून तिला जीवे ठार मारून तिचा खुन करणाऱ्या ०२ आरोपींना तात्काळ अटक करून त्यांचेविरूध्द दोषारोप पत्र दाखल केले व मा. सत्र न्यायालयात सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सबळ पुरावे व साक्षीदार सादर केल्याने आरोपीस शिक्षा झाली आहे.

सदर संवेदनशील गुन्हा दोषसिध्द झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना माहे जानेवारी–२०१८ चे बेस्ट कन्व्हेक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे दोषसिध्दी पारितोषिकाने सन्मानित केलेले आहे.

**<u>बांद्रा पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी/अंमलदार</u>**

| अ.क्र. | अधिकारी व अंमलदाराचे नाव | अ.क्र. | अधिकारी व अंमलदाराचे नाव |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक राजेन्द्र श्रीमंधार काणे | ५ | पोलीस उपनिरीक्षक प्रमोद आप्पासो हावळे |
| २ | पोलीस निरीक्षक संजिव मोरेश्वर भोळे | ६ | पोहक्र.१७३८/संतोष सिताराम घाडीगावकर |
| ३ | सहा.पोलीस निरीक्षक नंदकुमार रामहरी गायकवाड | ७ | पोनाक्र.८६०/राकेश चंद्रकांत कांबळी |
| ४ | पोलीस उपनिरीक्षक संदीप लक्ष्मण शिंदे | ८ | पोनाक्र.३२६८०/फकीरा मोहम्मद शेख |

––– ००० –––